**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

---

क्र. कोविमं/माध्य. परीक्षा/ ७२२ दिनांक : ०२/ ०८/ २०२१

प्रति,

मुख्याध्यापक,

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा.

**विषय : एप्रिल मे २०२१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **एप्रिल मे २०२१** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ट झालेल्या नियमित, खाजगी, पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख, यांचे वाटप माध्यमिक शाळांना **दिनांक ०७/०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रांमार्फत करण्यात येणार आहे.** याची सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी. साहीत्य घेऊन जाणेसाठी आपल्या अधिकारपत्रासह आपल्या शाळेचा प्रतिनिधी पाठवून साहीत्य घेऊन जाणेची दक्षता घ्यावी. **गुणपत्रिकांचे वाटप दिनांक ०९/०८/२०२१ रोजी दु.३.०० वा.विद्यार्थ्यांना करावयाचे आहे.**

संबंधित शाळांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व सोईनुसार शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे व सूचनांचे पालन करुन गुणपत्रक वितरण करावे. विद्यार्थ्यांना विशिष्ट तारखेस गुणपत्रक घेऊन जाणेस आग्रह धरु नये. तसेच शाळेमध्ये पालक / विद्यार्थी यांची एकाच वेळी गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन नियोजन करावे.

गुणपत्रिका विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन **नावांतील स्पेलिंग, विषय इत्यादी सर्व माहिती बरोबर असल्याची व गुणपत्रिकेत विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे.** त्रुटी असणारे गुणपत्रक कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. गुणपत्रकात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच गुणपत्रकाची संख्या कमी अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा. **त्रुटी असणाऱ्या गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत दिनांक ०८/०९/२०२१ पूर्वी मंडळाकडून दुरुस्त करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी. दुरुस्ती प्रस्तावासोबत योग्य ते दुरुस्ती शुल्क तसेच प्रमाणित केलेली माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.** तसेच यापूर्वी दुरुस्ती का कळविली नाही याबाबतच्या खुलाशासह जनरल रजिस्टर घेऊन मुख्याध्यापक / प्रतिनिधींनी समक्ष मंडळ कार्यालयात आल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास आपली सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**गुणपत्रिका दुरुस्तीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे:-**

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **शाळेचे शिफारस पत्र** | **२** | **मुळ गुणपत्रक** |
| **३** | **जनरल रजिस्टरची प्रमाणित छायाप्रत** | **४** | **लिपिकांनी मुख्याध्यापकांना दिलेला खुलासा (प्रिलिस्ट दुरुस्ती का कळविली नाही याबाबत)** |
| **५** | **मुख्याध्यापकांनी मंडळास दिलेला खुलासा** | **६** | **दुरुस्ती शुल्क रु.१५०/-** |

तरी सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व सूचनांची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**महत्त्वाचे :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) सन २०२१ परीक्षेच्या तोंडी / प्रात्यक्षिक/ अंतर्गत मुल्यमापन/ श्रेणी परीक्षेसाठी आपणास देण्यात आलेल्या कोरे OMR गुणतक्ते/ श्रेणी तक्ते, एक पानी कोऱ्या उत्तरपत्रिका इत्यादी साहित्य वेगळ्या पाकिटामध्ये (शाळेचा सांकेतिक क्रमांक व सन २०२१ कोरे OMR गुणतक्ते/ श्रेणी तक्ते, एक पानी कोऱ्या उत्तरपत्रिका असे ठळक अक्षरामध्ये नमूद करुन) उपरोक्त दिनांकास वितरण केंद्राकडे जमा करण्यात यावे. सदरचे साहित्य जमा केल्यानंतरच गुणपत्रिका व शाळा अभिलेख देण्यात येईल याची नोंद घ्यावी तसेच शिक्षण संक्रमण व नोंदणी शुल्क चलन ज्या शाळांनी मंडळाकडे जमा केलेले नाही त्या शाळांनी वितरण केंद्रावर जमा करावे.**

(देविदास कुलाळ),

विभागीय सचिव,

कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर